दिवाणी किरकोळ अर्ज. २११/२०२२
सुभद्राबाई सोनुने व इतर ३
–वि–
कोणीही नाही
CNR No.MHBU020010512022

## <u>निशानी क्र. १ खालील आदेश</u>

**०१.** अर्जदारांनी सदरहु अर्ज हा मुंबई नियमन कायदा १८२७ च्या नियम २ खाली दाखल केला आहे.

**०२.** अर्जदारांचे मयत(माणिकराव तुकाराम सोनुने) यांच्याशी असलेले संबंध खालील प्रमाणे दर्शविण्यात येत आहेत.:

| अ.क्र. | नांव | मयताशी असलेले नाते |
|---|---|---|
| १ | श्रीमती.सुभ्रदाबाई माणिकराव सोनुने, वय–७६ | पत्नी |
| २ | मधुकर माणिकराव सोनुने,वय–४४ | मुलगा |
| ३ | सुनंदा सदाशिव तायडे,वय–५५ | मुलगी |

**०३.** अर्जदारांच्या अर्जात पुढे असे आले आहे की, अर्जदारांचे पती मयत माणिकराव तुकाराम सोनुने याचा मृत्यु दिनांक ०२.०२.१९९३ रोजी, बुलडाणा, ता. जि. बुलडाणा येथे झाला. अर्जदार क्र १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क्र.२ ते ३ हे मयताचे अपत्ये आहेत. अर्जदारांच्या अर्जात पुढे असे आले आहे की, अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत माणिकराव तुकाराम सोनुने, यांचे वर्ग १ चे वारस आहे. सबब

अर्जदारांनी सदरचे प्रकरण हे माणिकराव तुकाराम सोनुने याचे अर्जदार हे वारस आहे असे घोषीत होऊन मिळणेबाबत दाखल केले आहे.

**०४.** अर्जदार क्र.१ श्रीमती. सुभ्रदाबाई माणिकराव सोनुने हिने तिचा शपथेवर पुरावा प्रतीज्ञालेख निशानी क्र. **१३** वर दाखल केला आहे. तसेच अर्जदार यांनी माणिकराव तुकाराम सोनुने मृत्यु प्रमाणपत्राची पडताळणी केलेली प्रत निशानी क्र. **३–अ** वर दाखल केली आहे. त्यानंतर अर्जदार यांनी निशानी क्र. **१४** खाली पुरावा बंद पुरसीस दाखल केली.

**०५.** अर्जदार यांचे वकील श्री. एस. व्ही. मिसाळ यांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदार हे मयत माणिकराव तुकाराम सोनुने याचे वारस आहेत तसेच अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामाकरीता तसेच कुंटुंब निवृत्ती वेतनाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र देण्यात यावे अशी विनंती केली.

**०६.** वकीलाचा युक्तीवाद ऐकला, अर्जाची व दाखल दस्तऐवजांची पाहनी केली. अर्ज दाखल केल्यानंतर सन १८२७ चा मुंबई विनियम ८ च्या नियम २ व ३ प्रमाणे न्यायालयाने अर्जदाराचा अर्ज मिळाल्यानंतर परीशिष्ट 'अ' मध्ये दिलेल्या नमुन्या नुसार घोषनापत्र काढले. त्यावरुन दिनांक २१.११.२०२२ च्या दैनिक "सामना" पेपर मध्ये जाहीर नोटीस प्रकाशीत केली. ती निशानी क्र. **१२** नुसार अभिलेखात

दाखल आहे. तसेच जाहीरनामा हा मयताच्या घरावर व तलाठी कार्यालय, तसेच दिवाणी न्यायालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आला तो निशानी क्र.९ नुसार अभिलेखात दाखल आहे.

**०७.** अर्जदारांच्या हक्कास आक्षेप घेणा–या सर्व इसमांनी घोषणापत्राच्या तारखेपासुन एका महीन्याच्या आत न्यायालयास निवेदन करुन आपल्या हरकती नोंदवाव्या अशी उक्त घोषणापत्राव्दारे त्यांना विनंती करण्यात आली होती. परंतु त्यावरुन पुरेशी होईल अशी कोणाचीही हरकत घेण्यात आली नाही. अर्जदांर यानी दाखल केलेला पुरावा हा उलटतपास न झाल्यामुळे अबाधित राहीला. अर्जदारांनी दाखल केलेले दस्तऐवज व अर्जदारांचा अबाधीत पुरावा यावरुन असे लक्षात येते की, माणिकराव तुकाराम सोनुने दिनांक ०२.०२.१९९३ रोजी मयत झाले. तसेच अर्जदार क्र १ ते ३ हे मयत माणिकराव तुकाराम सोनुने यांचे वारस असल्याचे दिसुन येते. एकंदरीत सर्व बाजुचा विचार करुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्जदारांचा अर्ज मंजुर करण्यात येते.

२. मुंबई नियमन कायदा, १८२७ च्या विनीयम ८ नियम २ व ३ प्रमाणे अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत माणिकराव तुकाराम सोनुने यांचे

मान्यता दिलेले वारस असल्याबाबतचे परीशीष्ट 'ब' मधील नियमानुसार योग्य ते न्यायालयीन शुल्क आकारुन प्रमाणपत्र देण्यात यावे.

३. वारस प्रमाणपत्रावर दिवाणी नियमावलीचा परीच्छेद ३१२ नोंदवावा.

४. सदरच्या प्रमाणपत्राव्दारे मयताच्या मिळकतीवर अर्जदारांचा कुठलाही प्रकारचा अधिकार प्रस्थापीत होणार नाही.

५. अर्जदारांनी विहीत न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर त्यांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात यावे.

६. याव्दारे प्रकरण बंद करण्यात आले.

दिनांक १०.०१.२०२३.

स्वा/-

[**श्रीमती. एन. एम. जमादार**]

सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर, बुलडाणा